शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे सायंदैनिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व परुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खाजगी वितरण)
अंक जानेवारी २०२३
अंक क्र. ५३
Website : www.bhidekul.in
Email : office@bhidekul.in

वर्ष : 49 अंक : 272 कोल्हापूर सोमवार ता. 20 फेब्रुवारी 2023 किंमत 2 रुपये ✼ पाने 4 Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI

## अभिनंदन !



विजया देव पुस्तक मंडळाने आयोजित केलेल्या पत्रलेखन स्पर्धेमध्ये सौ. जयश्री कीर्तने (भिडे), पुणे यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. ह्या स्पर्धेसाठी एकूण २०३ जणांचा सहभाग होता. सौ. जयश्री यांचे नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान तर्फे हार्दिक अभिनंदन आणि यशासाठी हार्दीक शुभेच्छा ! (सोबत स्पर्धेतील पारितोषिक मिळालेले पत्र)

### मनातल्या पोटमाळ्यास

पत्र लिहिण्यास कारण की, मी द्विधा मनस्थितीत आहे आणि ह्या दुविधेचं उत्तर जर कोणाकडे असेल तर ते तुझ्याकडेच. जरा आवरता घ्यावा पसारा म्हणून कपाटातल्या साड्या निस्तरायला घेतल्या आणि तू अलगद सरकवलीस ती मोतिया रंगाची, जांभळ्या काठांची तलम रेशमी धर्मावरम साडी माझ्या हातात. चाळीस वर्षांपूर्वी अत्यंत आवडलेली पण लग्न खरेदीच्या वेळी, ''बजेटमध्ये बसत नाहीये ही'' असं म्हणून बाजूला सारली गेलेली. ही बया, बरी पोटाळून ठेवलीयेस रे ! ती जरा उलगडून बघत्ये तर पाठून पन्नासेक वर्षांपूर्वीचं वर्गातल्या श्रीमंत मुलींच्या कंपासपेटीतलं सुंगधी खोडरबर हळूच डोकावलं. त्याचा सुवास अनुभवायला जरा पुढे होते तोच जाणवला जन्माआधीच झोपी गेलेल्या बाळाचा फक्त मलाच ऐकू आलेला तो चुकलेला ठोका, इवल्याश्या काचेच्या कुपीत तशाच निरागसतेनी पहुडलेला. तुझ्याकडचा खजिना असा खुला केलास आणि मी खुळावून गेले. आताशा जरा एकलपणा मिळाला की तुझ्याकडे धाव घेण्याचा छंदच लागला आहे. कधी सापडतो तो पहिला आणि शेवटचा एकमेव निसटता स्पर्श, कळत नकळतसा कटाक्ष, एखादाच आर्जवी सूचक शेरा, तर कधी तानपुऱ्याच्या मलूल तारा, पहिला पांढरा केस आणि पहिली सुरकुती, तेही इथेच गपचूप दडून बसलेत. एकदा पाहिलं, तर एम.ए.चं हुकलेलं सुवर्णपदक आणि निसटलेली पीएच.डी.ची संधी एकाच फळीवर मांडून ठेवलेली आहेस. मी दुर्लक्ष केलं तरी तुझी आवरासावर चालूच असते म्हणायची ! पत्र लिहिण्याचा मूळ उद्देश सोडून किती भरकटले मी ? तर झालं असं की, काल नेहमीच्या असोशीने मी तुझ्यात डोकावून पाहात होते, तेव्हा लक्षात आलं, किती साठवून ठेवलंय मी... सध्या लक्ष द्यायला वेळ नाही, आत्ता उपयोगाची नाही, आत्ताच तडमडायची काय गरज होती, जग काय म्हणेल, ह्या न त्या कारणाने मी किती स्मृतींना ढकलून दिलंय तुझ्याकडे आणि किती ममत्वाने सामावून घेतलंयस तू तुझ्या विशाल उदरात ! घर आवरताना कित्येक वस्तू मी दान करते आहे तश्याच सहजतेने ह्या स्मृतींचं कालौघात विसर्जन करून तुझा भार हलका करावा का रे ? मुळात असा पोटमाळा भरून ठेवावाच का रे ? तुझ्या अस्तित्वाच्या आवश्यकतेचा प्रश्न मी तुलाच विचारते आहे. ह्या प्रश्नाला उत्तम आहे की नाही माहीत नाही. पण असलंच तर ते तुझ्याकडेच हे नक्की.

## वैद्यकीय मदतीचे आवाहन

श्री. संदीप शरद भिडे, रा. पुणे, वय ४० हे गेली २ वर्षे श्वसनाच्या गंभीर आजाराने आजारी आहेत. ते अविवाहित असून त्यांचे वडील श्री. शरद ना. भिडे हे निवृत्त कर्मचारी असून आतापर्यंत त्यांनी सुमारे ३ लाख रुपये वैद्यकीय खर्च केला आहे. श्री. संदीप हे गेली २ ते ३ वर्षे ह्या गंभीर आजाराने आजारी असल्यामुळे ते सध्या नोकरीमध्ये नाहीत. श्री. शरदराव भिडे यांनी भिडे प्रतिष्ठानकडे वैद्यकीय मदतीसाठी अर्ज केलेला असल्यामुळे आपण नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या माध्यमातून आर्थिक मदत करणार आहोत. इच्छुक दानशूर व्यक्तींनी आपली आर्थिक मदत रोख/धनादेश किंवा ऑनलाईन द्वारा भिडे प्रतिष्ठानच्या पुणे येथील पत्रव्यवहार पत्त्यावर पाठवावी. सदर आर्थिक मदत पाठविल्यानंतर पैसे भरल्याची पावतीची झेरॉक्स, आपल्या नाव व पूर्ण पत्त्यासह दिलीप भिडे (९६५७५४१२३६) किंवा माधव भिडे (९७६३७२७६८८) ह्यांना कळवावे. त्यानुसार आपणाकडे रितसर पावती पोच करता येईल.

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
द्वारा - ले. क. सुनिल वा. भिडे
१४२६, सदाशिव पेठ, ए-२०१, नीलसदन अपार्टमेंट,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे - ४११ ०३०.
मो. ९६२३०१७४४४

**ऑनलाईन पाठविण्यासाठी -**

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
टी.जे.एस.बी. सहकारी बँक
सदाशिव पेठ शाखा, पुणे -३०
अकाऊंट नं. - ०१८११०१०००० १२९४
IFSC Code - TJSB 0000018

## ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ देणगीदार

| | | |
|---|---|---|
| १) डॉ वसुधा विद्याधर भिडे, पुणे | रु. ५,००० | हितचिंतक |
| २) श्रीमती मोहिनी मंदार भिडे, डोंबिवली | रु. १,००० | आजीव सभासद |

सोशल मिडियावर (उदा. फेसबुक, व्हॉट्सॲप इ.) 'आम्ही भिडे' वा तत्सदृश नावाने काही ग्रुप असतील तर सदर ग्रुप नित्युंदन गोत्रिय भिडे प्रतिष्ठानचे अधिकृत नाहीत, ह्याची कृपया नोंद घ्यावी.

आम्ही भिडे

अंक ५३ वा

संपादक : श्री. प्रभाकर शंकर भिडे
कार्यकारी संपादक : श्री. दिलीप भिडे
संपादक मंडळ : ले. क. सुनिल भिडे, श्री. प्रदीप ज. भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. राजेंद्र भिडे, श्री. विनायक वि. भिडे, श्री. माधव भिडे
सल्लागार मंडळ : श्री. सुनिल भिडे (अभिरूची) पुणे, सौ. गौरी प्र. भिडे (डोंबिवली), श्री. शंतनु नि. भिडे, के. मो. भिडे, सौ. मेघना भिडे, डॉ. प्रतिभा भिडे
अक्षर जुळणी : सौ. विनीता डबीर

पत्रव्यवहारासाठी पत्ता

**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**

**१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,**
**पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०**
**मो. ९६२३०१७४४४**

मुंबई कार्यालय : **सौ. संपदा भिडे**
ए ५०३, श्रीसाई शारदा हौसिंग सोसायटी, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८. मो. ९८१९९ ५१३९१

**आपल्या वाढदिवसानिमित्त**
**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला**
**देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा !**

**सूचना :** आजीव सभासद वर्गणी, देणगी, जाहिरात इत्यादी स्वरूपात रक्कम ऑनलाईन ट्रान्स्फर करण्यासाठी खालील माहिती -
**TJSB सहकारी बँक लि; सदाशिव पेठ शाखा, पुणे-30.**
**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान,**
अकौंट नंबर - 018110100001294,
IFSC Code - TJSB0000018
विशेष सूचना - रक्कम ट्रान्स्फर केल्यावर दिलीप भिडे, पुणे यांना 9657541236 या क्रमांकावर किंवा office@bhidekul.in ह्या मेलवर कळवावे म्हणजे पावती पाठवली जाईल.

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान विवाह वाढदिवसाच्या शुभेच्छा !**

| | | |
|---|---|---|
| **जानेवारी** | श्री. सतीश व सौ. स्मिता भिडे, पुणे | २-१-१९८१ |
| **फेब्रुवारी** | श्री. प्रदीप व सौ. गौरी भिडे, डोंबिवली | १९-२-१९९५ |
| | श्री. उमेश व सौ. अपर्णा भिडे, ठाणे | २४-२-१९७३ |
| | श्री. मुकुंद व सौ. मीना भिडे, चिपळूण | २३-२-१९९१ |
| | श्री. मधुकर व सौ. नीला भिडे, मालाड | २८-२-१९७० |
| | ॲड. प्रशांत व सौ. प्रज्ञा भिडे, दादर | २२-२-२००२ |
| **मार्च** | श्री. दिलीप व सौ. वर्षा भिडे, पुणे | १२-३-१९८५ |
| | श्री. राजेंद्र व सौ. संपदा भिडे, दादर | २३-३-१९९८ |

## ॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥

### श्रीमती सुमती वामन भिडे



आम्ही भिडे मुखपत्राच्या ज्येष्ठ सल्लागार व मार्गदर्शक **श्रीमती सुमती वामन भिडे,** (वय ९३) ह्यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. आपल्या प्रतिभाशक्तीने अंकासाठी त्या नेहमीच विविध लेखन करीत होत्या. त्या नुसत्या लेखिका किंवा कवी होत्या असे नाही तर वाचन, कथालेखन, पाककृती, वीणकाम ह्यामध्ये सुद्धा त्यांनी अनेक पारितोषिके मिळविली होती. वयाची नव्वदी ओलांडल्या-नंतरसुद्धा अगदी शेवटच्या श्वासापर्यंत आपले लेखनकार्य सुरू ठेवले होते. विशेष म्हणजे ''केळवडे येथील देवस्थान'' त्यांनी दिलेला लेख ह्या अंकापासून आपण क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत. अनेक दिवाळी अंक, मासिके यामध्ये त्यांचे लघुकथा, ललित लेख आदि लेखन साहित्य प्रसिद्ध होत असे आणि ९०व्या वर्षीही त्यांनी पारितोषिके मिळविली आहेत. त्यांचा हा उत्साह तरुणांना लाजवेल असाच होता. भिडे प्रतिष्ठानतर्फे त्यांनी पुरस्कारसुद्धा पुरस्कृत केले आहेत. सामाजिक कार्यातही त्यांचा मोठा सहभाग होता. भिडे प्रतिष्ठान आणि समस्त भिडे परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांना चिरशांती लाभो ही प्रार्थना !

**महीमानं यदुत्कीर्य तव संहीयते वचः ।**
**क्षमेण तद्शक्त्या वा न गुणानाभियतया ॥**

(तुमचा महिमा गाता गाता आम्हाला कुठेतरी थांबावे लागते. परंतु त्याचे कारण एकतर गाता गाता आम्ही दमतो किंवा तुमच्या गुणांचा हिशोब ठेवता येत नाही.)

**दिलीप भिडे,** विश्वस्त व सचिव

**सहवेदना :** भिडे कुलातील निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे. **१) श्रीमती सुमती वामन भिडे, पुणे**

**व्यक्तिगत आर्थिक स्थैर्याचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठी तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एकदा देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा !**

## भिडे प्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

### जानेवारी

१. श्री. श्रीकांत प्रभाकर भिडे, रोहा १
२. श्री. प्रभाकर शंकर भिडे, सोलापूर १
३. श्री. विश्वनाथ दिवाकर भिडे, पुणे १
४. श्री. केदार विनय भिडे, पुणे १
५. श्री. वसंत मोरेश्वर भिडे, पुणे ३
६. श्रीमती वीणा वसंत भिडे, ठाणे ३
७. श्री. मिलींद संतोष भिडे, सांगली ५
८. श्री. चिन्मय श्रीकृष्ण भिडे, पुणे ६
९. श्री. कौस्तुभ प्रदीप भिडे, डोंबिवली ६
१०. श्री. गजानन सदाशिव भिडे, पुणे ९
११. सौ. चित्रा विजय भिडे, भोपाळ ११
१२. श्री. संदीप कृष्णराव भिडे, बेळगांव ११
१३. श्री. गिरीश प्रभाकर भिडे, पंढरपूर ११
१४. श्री. प्रसन्न भास्कर भिडे, मुंबई १२
१५. सौ. सुकृता संदीप भिडे, अंमळनेर १२
१६. श्री. विलास विठ्ठल भिडे, दहिसर १३
१७. श्री. मकरंद दत्तात्रय भिडे, पंढरपूर १४
१८. डॉ. विजय कृष्णा भिडे, भोपाळ १५
१९. सौ. शैलजा अरविंद वाडदेकर, पुणे १५
२०. डॉ. विवेक यशवंत भिडे, रत्नागिरी १६
२१. श्री. कैलास जगदीश भिडे, मुंबई १९
२२. श्री. नारायण वसंत भिडे, जबलपूर २०
२३. श्री. मंदार श्रीकृष्ण भिडे, पुणे २२
२४. सौ. विद्या विकास भिडे, सांगली २२
२५. श्री. प्रसाद माधव भिडे, माभळे २२
२६. श्री. उमेश विठ्ठल भिडे, ठाणे २३
२७. श्रीमती कुसुम नारायण नगरकर, पुणे २४
२८. श्री. प्रतापसिंह विष्णुपंत भिडे, नाशिक २४
२९. सौ. विद्या चिंतामणी भिडे, ठाणे २५
३०. श्री. विलास राजाराम भिडे, मुंबई २५
३१. श्री. मधुकर शंकर भिडे, रायगड २६
३२. श्रीमती मनाली भिडे, पुणे २८
३३. श्री. परीक्षित सुहास भिडे, पुणे ३०

### फेब्रुवारी

१. कु. राजस प्रदीप भिडे, पुणे २
२. श्री. संजय दत्तात्रय भिडे, कोल्हापूर ३
३. श्री. सारंग शरद भिडे, पुणे ५
४. श्री. मंदार भगवान भिडे, रत्नागिरी ७
५. श्री. विजय अरविंद भिडे, पुणे ८
६. श्री. विद्याधर शंकर भिडे, डोंबिवली ८
७. श्री. शरद नारायण भिडे, पुणे ९
८. सौ. गौरी श्रीगणेश जोगळेकर, कल्याण ९
९. श्री. निनाद दत्तात्रय भिडे, ठाणे ९
१०. कु. ईरा हर्षवर्धन भिडे, पुणे १०
११. श्री. विश्वनाथ रघुनाथ भिडे, कामशेत १०
१२. श्री. जयंत शंकर भिडे, ग्वाल्हेर ११
१३. सौ. मृणाल शार्दुल भिडे, पुणे १२
१४. सौ. सुजाता प्रसन्न भिडे, मुंबई १३
१५. सौ. कल्पना संजय भिडे, माणगांव १५
१६. श्री. विकास कृष्णाजी भिडे, कल्याण १५
१७. श्री. प्रसाद प्रसन्न भिडे, पुणे १५
१८. सौ. सायली सचिन भिडे, अंमळनेर १६
१९. सौ. गौरी हर्षवर्धन भिडे, पुणे १७
२०. श्री. उदय गजानन भिडे, देवरुख १७
२१. श्री. श्रीराम वामन भिडे, पुणे १८
२२. श्री. अमित प्रकाश भिडे, डोंबिवली १८
२३. श्री. चिंतामणी जनार्दन भिडे, ठाणे १९
२४. श्री. विनायक केशव भिडे, रायगड २०
२५. श्री. संतोष सखाराम भिडे, डोंबिवली २०
२६. श्री. सागर गजानन भिडे, सांगली २०
२७. श्री. वसंत नरहर भिडे, ठाणे २१
२८. श्रीमती सुलभा दिनकर भिडे, कल्याण २२
२९. श्री. प्रकाश प्रभाकर भिडे, माभळे २३
३०. श्री. बाळकृष्ण दामोदर भिडे, पुणे २४
३१. सौ. मानसी मुंकुंद भिडे, बेळगांव २५
३२. श्री. माधव आनंद भिडे, डोंबिवली २५
३३. सौ. स्नेहल विजय भिडे, ठाणे २६
३४. श्री. विक्रांत दिलीप भिडे, पुणे २७
३५. ॲड. विनोद यशवंत भिडे, औरंगाबाद २७

### मार्च

१. श्री. प्रसाद रमेश भिडे, कल्याण १
२. श्री. मिलींद सोमेश्वर भिडे, बडनेरा १
३. सौ. अंजली विवेक भिडे, सांगली २
४. कु. स्वानंद श्रीकांत भिडे, रोहा ४
५. सौ. प्रज्ञा संतोष भिडे, ठाणे ४
६. सौ. संपदा राजेंद्र भिडे, दादर ५
७. श्री. प्रभाकर महेश्वर भिडे, कणकवली ६
८. श्री. काशिनाथ लक्ष्मण भिडे, सोलापूर ७
९. श्री. अमित ए. भिडे ७
१०. श्री. मिलींद मुकुंद भिडे, पुणे ७
१२. श्री. सुधीर केशव भिडे, पुणे ८
१३. सौ. शकुंतला मधुकर भिडे, रायगड १०
१३. श्री. विश्वनाथ गोविंद भिडे, पुणे ११
१४. कु. वेदांगी दिलीप भिडे, पुणे १४
१५. सौ. रोहिणी प्रभाकर भिडे, पुणे १५
१६. श्रीमती वनिता नरसिंह भिडे, पुणे १५
१७. सौ. मधुरा महेश भिडे, पनवेल १५
१८. श्री. बाळकृष्ण ल. भिडे, कर्नाटक १६
१९. श्री. सुदर्शन सुरेश भिडे, पुणे १६
२०. श्री. शरद शंकर भिडे, सांगली १७
२१. श्री. सुनील वामन भिडे, पुणे १७
२२. सौ. अनुराधा नरेंद्र भिडे, सांगली १८
२३. श्री. संजय भिडे, मुंबई १९
२४. श्री. शिरीष सुरेश भिडे, उत्तरप्रदेश २०
२५. श्री. दिनानाथ पांडुरंग भिडे, ठाणे २३
२६. श्री. अनय विजय भिडे, ठाणे २३
२७. श्री. तनय विजय भिडे, ठाणे २३
२८. श्री. एम. उपेंद्र भिडे, बेंगलोर २४
२९. श्री. मा. य. भिडे, हैद्राबाद २५
३०. श्री. अक्षय चारुदत्त भिडे, माभळे २७
३१. कु. किर्ती प्रकाश भिडे, चिपळूण २९
३२. सौ. स्वाती अजय भिडे, पुणे ३०
३३. सौ. आशा अनिल भिडे, भोपाळ ३०
३४. श्री. महादेव जनार्दन भिडे, मुंबई ३०
३५. श्री. अभिषेक विजय भिडे, पनवेल ३१
३६. सौ. राधिका श्रीधर रानडे, पुणे ३१
३७. श्री. अमोल शशिकांत भिडे, पुणे ३१

## तोच आहे

तो आहे, असाच आहे,
तो घराला सांभाळतो,
कष्टतो, लढतो, विव्हळतो,
तो वेदनांवर भाळतो,
झेलतो तो संकटे नि,
वादळेही पेलतो,
घराला सांभाळताना,
खूप सारे झेलतो,
तिचा श्रृंगार निरखतो,
त्याचाच त्याला गर्व आहे,
ती आनंदी आहे सदा हा,
त्याच्यासाठी स्वर्ग आहे.
प्रेम सांगण्यासाठी कधी,
तो योग्य वेळही शोधतो,
अन व्यक्त न होता कधी,
तो कृतीतून बोलतो.
सुखी व्हावी पुढील पिढी,
तो सततच दत्त आहे,
काय हवे काय नको,
त्याचेच सतत लक्ष आहे.
ती आहे आधार आहे,
तोच राही पाठीराखा,
तो कर्तव्यदक्ष आहे,
बाप, बंधू, मित्र सखा !!

– हेमंत भिडे, जळगाव

## कवितेची कविता

संगीतकाराला मित्र म्हणाला,
कविता, गाणं काहीच मला सुचत नाही,
कितीदा लिहिलं तरी,
माझं मलाच रुचत नाही !
संगीतकार म्हणाला, अरे वेड्या
गाणं असं स्फुरत नाही,
कवितेविणा गाण्याला,
अस्तित्वच उरत नाही !
बाजू दोन वेगवेगळ्या
पण एकच असतं गाणं
आधी सुरचित कविता होते
होतं मग सुमधुर गाणं !
गाणं आहे रांगोळी एक
तर कविता आकृतिबंध
भाव, आशय, गेयता यांना
बांधणारा एक छंद !
गाण्याच्या लोकप्रियतेचा
कविता हा 'गाभा' आहे,
कवितेची लोकप्रियता
ही कवीची 'आभा' आहे !
गाणं जरी एक कविताच असलं
तरी प्रत्येक कविता गाणं कसं होईल?
आडातच मुळात नसेल
तर पोहोऱ्यात कुठू येईल ?
सुचत असेल एखादी तर
आशयघन कविता कर,
भिडली जर का हृदयाला
तर चढविन त्यावर स्वर !

– चिंतमणी भिडे, ठाणे

## पाठलाग

खडतर होती वाट
चहूकडे ते जंगल
चाहूल लागे मनाला
होणार होते अमंगल
वटवाघूळांची टोळी
जंगलात अचानक घुसली
पाहून त्यांना एकत्र
पाऊलेही बिथरली
अचानक विझला दिवा
होती अंथरली वाट
नाही किर्रर कुठेही
भयाण होता शुकशुकाट
मागून आला आवाज
छुमछुम पैंजण वाजी
पाहण्यास पाठीमागे
नेत्र नव्हते राजी
केली मोठी हिम्मत
एकवटला आज धीर
शक्ती होती अंगात
मन होते गंभीर
खेळ होता मनाचा
भीती मनी दाटी
माझीच सावली मला
भयाण भूत वाटी
संपली ती भीती
मजा झाली सारी
येऊन मी सांगितली
मग भूतकथा ही घरी

– करुणा भिडे

## करावं तरी काय ?

उन्हाचे चटके बसताना
हाय हाय करतोस
गारव्यासाठी पाऊस म्हणतो
म्हणूनच मी बरसलो
हिवाळ्यात कुडकुडतोस
तेव्हा मला यावच लागतं
मानवा ! केवळ तुझाच
विचार करून कसे चालेल ?
अन्न, वस्त्र, निवारा
आणि निसर्गासाठी
आम्हाला तापावही लागतं
आणि बरसावंही लागतं
कधी, कधी आम्हाला सुद्धा
येतो कंटाळा, पण काय करणार ?
ईश्वराने नेमून दिलेली कामं
करावीच लागतात
एवढं करून लोक म्हणतात,
काय हा पाऊस ! कंटाळा आला
नुसता कोसळतोय
जराही उघडीप नाही
उन्हाळ्यात उकाड्याने
हैराण होऊन म्हणतात
ये बाळा पावसा लवकर ये
अरे, आम्ही करावे तरी काय ?
कसं वागावं हेच कळत नाही !

उज्ज्वला साठे, पुणे

## कवडसा

पुणे मुंबई प्रवासात
थांबता गाडी घाटात,
चढली एक चिमुरडी
घेऊन परडी हातात।
पाही साशंक नजरेने,
विकी गजरे मोगऱ्याचे
एकाला रुपये पंधरा,
चार पन्नास रुपयांचे।
गाडी सुरू होऊन
बराच वेळ गेला,
एकही गजरा
नाही विकला गेला।
कुणीच घेईना गजरे,
बिचारी हिरमुसली
दाराजवळ उभा मी
तिथेच येऊन बसली।
केला विचार मनात
गजरे घेतले चार
साठ रुपये तिच्या
ठेवले हातावर।
चमकले तिचे डोळे,
खुलला चंद्र मुखाचा
डोळ्यात तिच्या गवसला
मला कवडसा सुखाचा।

– चिंतमणी भिडे, ठाणे

# अंक परत येणारे पत्ते

गेल्या वर्षात सुमारे ३० पेक्षा जास्त 'आम्ही भिडे' अंक बदललेला पत्ता किंवा अन्य कारणाने परत येत आहेत. आमच्याकडे परत आलेल्या अंकांचे पुर्नवितरण केले जाणार नाही. परंतु आपल्या माहितीकरिता खाली दिलेल्या यादीनुसार खालील व्यक्तींनी आपला नवीन अथवा बदललेला पूर्ण पत्ता आम्हाला लेखी पत्राने किंवा मेसेज करून मोबाईलवर कळविल्यास पुढील अंक वितरण अथवा पत्रव्यवहार सदर पत्त्याप्रमाणे केला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

**दिलीप भिडे, पुणे 9657541236,** **ले.क. सुनिल भिडे, पुणे 9623017444**
**प्रदीप भिडे, डोंबिवली 9892504042** **सौ. संपदा भिडे, दादर 9819951391**

**(मुंबई विभाग)**

१) **स.क्र. २००४**
**दत्तात्रय बाळकृष्ण भिडे**
विलेपार्ले (पूर्व), मुंबई-५७

२) **स.क्र. ३३२६**
**जगन्नाथ वामन भिडे**
माटुंगा (पूर्व), मुंबई

३) **स.क्र. ३०६२**
वामन दत्तात्रय भिडे
बांद्रा (प.) मुंबई - ५०

४) **स.क्र. ३०९०**
**त्रिंबक दत्तात्रय भिडे,**
बोरिवली (पूर्व), मुंबई-९२

५) **स.क्र. ८०४०**
**सतीश जनार्दन भिडे**
गिरगांव, मुंबई - ४

६) **स.क्र. ७६३९**
**पद्माकर परशुराम भिडे**
मुंबई सेंट्रल, मुंबई-८

७) **स.क्र. ७४६८**
**प्रभाकर गोविंद भिडे**
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ५७

८) **स.क्र. ७४९६**
**विजय गंगाधर भिडे,**
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ५७

९) **स.क्र. ३०९३**
**प्रभाकर गोविंद भिडे,**
मुलुंड (पूर्व), मुंबई - ९१

१०) **स.क्र. ७५९१**
**अतुल दत्तात्रय भिडे**
बोरिवली (पूर्व), मुंबई - ६६

११) **स.क्र. ३०६८**
**प्रभाकर त्रिंबक भिडे,**
ताडदेव रोड, मुंबई - ७

१२) **स.क्र. ३१६२**
**कौस्तुभ विजय भिडे,**
दादर, मुंबई - २८

१३) **स.क्र. ७६२८**
**जनार्दन श्रीराम भिडे,**
ठाणे (पश्चिम), ४०० ६०४

१४) **स.क्र. २००९**
**सुनंद गणेश भिडे,**
ताडदेव, मुंबई - ७

१५) **स.क्र. ७४२५**
**विजयकुमार विश्वनाथ भिडे,**
कर्जतरोड, कुळगांव, बदलापूर

१६) **स.क्र. ७०१४**
**वसंत महादेव भिडे,**
घंटाळी सोसायटी,
ठाणे - ४०० ६०२

१७) **स.क्र. ८०३८**
**संतोष वसंत भिडे,**
घंटाळी रोड,
ठाणे - ४०० ६०२

१८) **स.क्र. ३२४४**
**शरद माधव भिडे,**
नौपाडा, ठाणे (पश्चिम)

१९) **स.क्र. ७१३२**
**जयंत अनंत भिडे,**
खारेगांव नाका,
कळवा, ठाणे

**(पुणे विभाग)**

२०) **स.क्र. ७३८७**
**कु. माणिक गोपाळ भिडे,**
वेताळनगर, कोथरुड, पुणे-२९

२१) **स.क्र. ७५१३**
**अनिल निळकंठ भिडे,**
सिंहगड रोड, पुणे - ३०

२२) **स.क्र. २०१७**
**संजय माधव भिडे,**
कोथरुड, पुणे - २९

२३) **स.क्र. ७३९७**
**मनोहर रामचंद्र भिडे,**
आळंदी रोड, पुणे - १५

२४) **स.क्र. ७१९२**
**अविनाश श्रीकांत भिडे,**
बिबवेवाडी, पुणे - ३७

२५) **स.क्र. ७५६३**
**अविनाश बाळकृष्ण भिडे,**
औंध, पुणे - ७

२६) **स.क्र. ८१८३**
**श्रीमती मीना अशोक भिडे,**
कोथरुड, पुणे - ३८

२७) **स.क्र. ३३४२**
**विद्या अश्विनकुमार भिडे,**
डेक्कन जिमखाना, पुणे - ४

**(ठाणे - डोंबिवली विभाग)**

२८) **स.क्र. ३३४४**
**सुषमा भालचंद्र भिडे,**
मालवीया रोड, डोंबिवली (पूर्व)

२९) **स.क्र. ७५७०**
**दीपक दिगंबर भिडे,**
गोग्रासवाडी, डोंबिवली (पूर्व)

३०) **स.क्र. ३३४८**
**मोहन माधव भिडे,**
राजाजी रोड, डोंबिवली (पूर्व)

३१) **स.क्र. ७०२६**
**रमेश रामचंद्र भिडे,**
कल्याण शिळ रोड,
ठाणे (पश्चिम)

३२) **स.क्र. ८२४१**
**विद्याधर शंकर भिडे,**
देसले पाडा, डोंबिवली (पूर्व)

**(पनवेल विभाग)**

३३) **स.क्र. ७४९३**
**विनय गणेश भिडे,**
टिळक रोड, पनवेल

३४) **स.क्र. ३१०४**
**पद्माकर पांडुरंग भिडे,**
शिवाजी रोड, पनवेल

३५) **स.क्र. ७१४३**
**अतुल पद्माकर भिडे,**
शिवजी रोड, पनवेल

३६) **स.क्र. ३००७**
**मोरेश्वर भालचंद्र भिडे,**
नवअंकुर सोसायटी,
पनवेल ४१० २०६

**(सांगली-मिरज विभाग)**

३७) **स.क्र. ७४७७**
**डॉ. पुष्कर प्रभाकर भिडे,**
राजवाडा भाग, सांगली

३८) **स.क्र. ८२१४**
**अश्विनी अशोक भिडे,**
ऐश्वर्य थोटा,
दक्षिण कर्नाटक - ५७४२०१

३९) **स.क्र. ३३४९**
**विनय माधव भिडे,**
सत्येंद्र सोसायटी,
भरुच, गुजराथ

४०) **स.क्र. ७५११**
**विजय शरद भिडे,**
आदर्श मंगल कार्यालय,
मिरज ४१६ ४१०

# गलबतवाल्यांचा गणपती : गणेशगुळे, रत्नागिरी

हे श्रीगणेशाचे स्थान रत्नागिरी-पावस-पूर्णगड या मार्गावर असून पावसजवळून या गावाकडे जाण्याचा फाटा फुटतो. पावसपासून ४ किमी. तर स्वामी स्वरूपानंदांच्या गावातून ३ किमी. अंतरावर असणारे हे गाव मुख्य रस्त्यापासून आत असल्याने ते सहसा कोणाला माहीत नाही. रत्नागिरीहून फक्त २२ कि.मी. अंतरावर व पावसपासून पूर्णगडकडे जाताना पुढे उजव्या हातास एक फाटा फुटतो. तिथून पुढे ४ कि.मी. वर गणेशगुळ्याचे हे प्रसिद्ध मंदिर आहे. मंदिर सुमारे ४०० वर्षे जुने असून मंदिर बांधणी जांभ्या दगडातील आहे. सध्या त्यावर पांढऱ्या रंगाची रंगरंगोटी केलेली आहे. हे मंदिर पुरातन काळातील आहे. मंदिराची बांधणी जांभ्या दगडाची असून, मंदिर आज पण चांगल्या स्थितीत आहे. या मंदिरात प्रवेश करण्यासाठी दोन दरवाजे आहेत. दर्शनी बाजूच्या उजव्या दालनालगतचे दालन पूर्णपणे बंदच आहे. दोन्ही दालनांना जोडणारी सुमारे १२ फूट उंचीची एक मोठी शिळा आहे. ही शिळा म्हणजेच श्रीगणेश आहे असे मानले जाते आणि म्हणूनच या गणपतीला स्वयंभू संबोधले जाते, ही मूर्ती दक्षिणाभिमुख आहे. डोंगरउताराच्या बाजूने बघताना मंदिर सुमारे ४० फूट उंचीवर उभे असल्याचे दिसते. हे मंदिर शिवपूर्वकालीन असावे कारण इथल्या मंदिराची घुमटी वेगळ्याच प्रकारची आहे. घुमटीच्या प्रवेशद्वारावर एका मोठ्या दगडाची शिळा असून त्यामुळे प्रवेशद्वार बंद झाले आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात नेहमीप्रमाणे प्रचलित अशी गणेशमूर्ती नसून याच स्वयंभू शिळेला श्रीगणेश मानून त्याची पूजा केली जाते. या मंदिर परिसरात आवर्जून बघण्यासारखं एक मानवनिर्मित आश्चर्य आहे. मंदिराजवळच सत्तर फूट लांबीची एक विहीर दगडात खोदली असून ती बघण्यासारखी आहे. फार पूर्वी केव्हातरी ही विहीर इथल्या सड्यावर का बांधली ? तिचे पाणी किती खोलीवर लागले ? त्याकाळी ही विहीर खणताना काय काय अडचणी आल्या ? हे सर्व प्रश्न आज तरी अनुत्तरीत आहेत. विहीर मात्र बघण्यासारखी असून हे मानवनिर्मित आश्चर्य बघून स्तिमित व्हायला होते. पूर्वीच्या काळी या गणपतीच्या नाभीतून म्हणजेच या शिळेतून पाण्याची संततधार वाहात असे आणि ते तीर्थ एका गोमुखातून बाहेरच्या बाजूस पडत असे. एके दिवशी ते पाणी येणे अचानक बंद झाले. अर्थात त्याला काहीतरी नैसर्गिक कारण असावे परंतु तेव्हापासून श्रद्धाळूंच्या मनात मात्र देवाने गणेशगुळ्याहून गणपतीपुळ्याला प्रस्थान केले अशी श्रद्धा बनली.

गणेशगुळ्याच्या गणपतीला 'गलबतवाल्यांचा गणपती' म्हणूनही ओळखतात. रत्नागिरी ते राजापूर या सागरी महामार्गावर पावस गावापासून ३ कि.मी. अंतरावर असलेल्या गणेशगुळे गावाजवळील किनारपट्टीवर समुद्रमार्गे गलबतांमधून व्यापार करणारे अनेक गलबतवाले पूर्वी या ठिकाणी व्यापारउदिम सुरळीत व्हावा, असं या गणपतीकडे मागणं मागायचे. तेव्हापासूनच हा गणपती 'गलबतवाल्यांचा गणपती' म्हणून ओळखला जाऊ लागला. आज तो ओळखला जातो, 'इच्छापूर्ती गणपती' म्हणून ! या मंदिराबाबत अनेक कथा सांगितल्या जातात. त्यापैकीच एक अशी की, सुमारे ४०० वर्षांपूर्वी पावस येथील वेदमूर्ती रामचंद्रपंत चिपळूणकर हे दशग्रंथी ब्राह्मण पोटशुळाच्या आजाराने त्रस्त होते. या विकाराला कंटाळलेल्या चिपळूणकरांनी आगरगुळे गावाजवळील समुद्रात देहत्याग करण्याचा निश्चय केला. ते समुद्राच्या दिशेने चालत जात असतानाच, पोटदुखी वाढून ते डोंगरमाथ्यावर बेशुद्धावस्थेत पडले. यावेळी त्यांना श्रीगणेशाचा साक्षात्कार झाला. 'माझं इथे वास्तव्य असून, या ठिकाणी असणाऱ्या विहिरीतलं पाणी प्राशन कर, तुझी व्याधी बरी होईल.' या ठिकाणी चिपळूणकर यांनी २१ दिवस गणेशाची आराधना केली. त्यानंतर त्यांना आपला विकार बरा झाल्याचं लक्षात आलं. चिळूणकरांना झालेला साक्षात्कार व त्यांचा पोटशुळाचा आजार बरा झाल्याचे गावात समजल्यानंतर अनेकांनी या गणेशाचे दर्शन घेतले. श्रीगणेशासमोर बोललेल्या इच्छा पूर्ण होत असल्याने, हा गणपती 'इच्छापूर्ती गणेश' म्हणूनही ओळखला जाऊ लागला. श्रीगणेशामुळेच 'आगरगुळे'चे नाव 'गणेशगुळे' म्हणून रूढ झाले. गणेशगुळे गावातीलच पटवर्धन नामक सद्‌गृहस्थ त्याकाळी दिल्ली दरबारात होते. गणेशगुळे येथे मंदिर उभारण्यासाठी सहाय्य मिळावे म्हणून चिपळूणकरांनी पटवर्धनांना विनंती केली. साताऱ्याचे छत्रपती शाहू महाराज यांच्यामार्फत त्यांनी निधी उपलब्ध करून दिला. त्यांच्या योजनेनुसार या ठिकाणी सुबक मंदिर उभे राहिले होते. १९७० मध्ये या छोट्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. नागपूर येथील गंगाधरपंत पटवर्धन व त्यांचे वंशज मंदिरातल्या दिवाबत्तीसाठी त्याकाळी शंभर रुपये पाठवत असत. आजही दरसाल ही रक्कम पाठवली जाते. ग्रामस्थ व रत्नागिरी शहर परिसरातील गणेशभक्तांनी मंदिराची डागडुजी केली आहे. पिण्याच्या पाण्याची सुविधाही या ठिकाणी करण्यात आलेली आहे. श्रीगणेशाबाबत अनेक रंजक अख्यायिका सांगितल्या जात असल्यामुळे या मंदिरात येणाऱ्या भक्तांचा ओघ दिवसागणिक वाढत आहे. मंदिराभोवतीचा परिसर शांत व निसर्गसंपन्न असा आहे. हे मंदिर टेकडीवर आहे, परंतु पायी जाण्यासाठी व वाहने जाण्यासाठीही मार्ग आहे. वाहनाने गेल्यास मंदिरापासून ५ मिनिटांवर समुद्रकिनारा आहे. या किनाऱ्यावरील शुभ्र वाळू व दाट सुरूबन पर्यटकांना अधिकच आकर्षित करते. या ठिकाणी पर्यटकांचा वाढता ओघ लक्षात घेऊन या गावात आता जेवणाखाण्याचीही सुविधा काही ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

पश्चिमेला अथांग अरबीसमुद्र. त्याला लागूनच डोंगररांगा... हिरवीगार वनसंपदा... आंबा, काजू व नारळी-पोफळीच्या बागा... अशा सुंदर परिसरात टेकडीच्या माथ्यावर गणेशगुळे गावात श्रीगणेशाचं स्थान आहे. मंदिर परिसर अतिशय शांत असून मंदिराच्या आवारात उभे राहिल्यास समोर सुंदर वनश्री दिसते. दरवर्षी भाद्रपद व माघी चतुर्थीला या ठिकाणी गणेशाचा मोठा उत्सव साजरा होत असतो.

✻ संकलन : **सुधीर लिमये, पेण**

✻ स्रोत : **गुगल**

# मौलिक मंत्र : प्रत्येक गोष्ट जागच्या जागीच हवी

● माझा चष्मा कुठे गेला ? इथेच कुठेतरी ठेवला होता. ● गाडीची किल्ली कुठे ठेवली आहेस ? मला ऑफिसला उशीर होतोय. ● पिंकी, शाळेचा डबा काल कुठे टाकला होतास ? स्कूलबस यायची वेळ झालीये. ● दोन दिवस झाले, नेलकटर काही कुठे सापडत नाही. ● बाबा, माझी ओरिजिनल मार्कशीट कुठे ठेवली होती ? सबमिट करायचा आजचा शेवटचा दिवस आहे. ● घड्याळाचे वॉरंटी कार्ड इथेच ठेवलं होतं. आता नाही सापडलं तर दुरुस्तीचा चार्ज भरावा लागेल. ● चार दिवस झाले मॅरेज सर्टिफिकेट शोधतोय मी. पॉलिसीबरोबर जोडावे लागते. ● कुठे गेलं ते प्रोजेक्ट प्रपोजल ? आऊट ट्रे मध्येच ठेवलं होतं. ● त्या ड्रॉईंगची अ‍ॅप्रूव्हड कॉपी कशी सापडत नाहीये ? जागच्या जागी न ठेवलेल्या गोष्टी शोधण्यात आयुष्यातील कितीतरी अमूल्य वेळ आपण खर्च करीत असतो. ही बाब वाटते तेवढी क्षुल्लक नाही. नेपोलियनच्या पराभवाने युरोपच्या इतिहासाला निर्णायक कलाटणी मिळाली. आपल्या विजयाची दोन कारणे ड्यूक ऑफ वेलिंग्टनने दिली. एक म्हणजे रणभूमीवर मी नेपोलियनच्या अगोदर अर्धा तास पोचलो. हे कारण सर्वांना माहिती आहेच, आणि दुसरे कारण म्हणजे आमच्या प्रत्येक गोष्टीसाठी (सैन्य वा सामग्री) निश्चित जागा होती व प्रत्येक गोष्ट आपल्या जागी होती. "A place for everything and everything in its place." हे लक्षात असू द्या.

**दिलेली वेळ पाळा –** एखाद्याचे पैसे उसने घेणे आणि परत न करणे याला आपण फसवणूक म्हणतो. दिलेली अपॉईंटमेंट न पाळणे हेही तेवढेच आक्षेपार्ह आहे, किंबहुना थोडं जास्तच. कारण पैसे उशिरा का होईना पण परत करता येतात. परंतु एखाद्याचा फुकट घालवलेला वेळ मात्र आपण कधीच परत करू शकत नाही. तीन वाजता येतो म्हटल्यावर आपण ठीक ३ वाजता हजर राहायलाच पाहिजे. ५ मिनिटे उशीर झाला तरी तो उशीर झाला म्हणून नावापुढे एक लाल फुली पडते. तसेच अध्यक्षांनी केलेल्या उशिराने झेंडावंदनासाठी एक-एक, दोन-दोन तास बिचारी मुलं उन्हात उभी असतात. बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांची तासन् तास खरडपट्टी होते कारण ज्यांच्यासाठी बंदोबस्त असतो त्या व्यक्तीचा कार्यक्रम अचानक बदलतो. जेवढा गायक मोठा तेवढा तो श्रोत्यांना ताटकळत ठेवतो. आपण प्रत्येकाने वक्तशीरपणा ठेवला तर हे बदलायला वेळ लागणार नाही. ठरलेल्या दिवसापूर्वी मालाची डिलिव्हरी झाली नाही तर वॉल मार्टसारखी कंपनी लक्षावधींची आर्डर रद्द करते. दिलेली वेळ पाळणे याचाच अर्थ दिलेला शब्द पाळणे आणि आपल्या शब्दाची किंमत म्हणजेच आपली स्वतःची किंमत.

**हे आत्ताच करा –** ● जॉगींगला जायचं आहे. ● दार्जिलिंगला सूर्योदय बघायचा आहे. ● मुलांना सर्कस दाखवायची आहे. ● बंगाली भाषा शिकायची आहे. ● माझं तुझ्यावर प्रेम आहे हे तिला सांगायचं आहे. ● बेसीनमधील गळका नळ बदलायचा आहे. ● वजन कमी करायचं आहे. ● रेसकोर्सवर नशीब आजमावायचं आहे. ● पहाटे पक्षी बघायला जायचं आहे. ● अ‍ॅरोचे दोन शर्ट घ्यायचे आहेत. ● मुंबईत अमिताभ बच्चनला भेटायचं आहे. ● वडिलांशी मनसोक्त बोलायचं आहे. ● किशोरकुमार यांची सीडी ऐकत रात्र जागवायची आहे. ● अंटार्टिका वर जायचे आहे. जे करावसं खूप खूप वाटतं ते पुढे ढकलत राहू नका. आजचे काम उद्यावर ढकलले तर उद्या कदाचित उशीर झाला असेल.

**आयुष्यातील पहिली मोठी संधी –** तुमच्यातील खास बात त्यांनी हेरून तुम्हाला त्यामुळे चांगला 'ब्रेक' मिळाला. आज तुम्ही जे कोणी आहात ते बऱ्याच अंशी त्याच व्यक्तीमुळे. एखादा नातेवाईक, मित्र, शेजारी, बॉस की ज्याने तुमच्या अडअडचणीच्या वेळी स्वतःच्या खिशात हात घालून, तुम्ही पुढे जाल हे हेरून मदत केली. अशी माणसे फार थोडीच असतात. ज्याने मदत केली त्याला वेळ काढून एक पत्र लिहा. पुन्हा एक सुंदर नाते जन्माला येईल. तसेच आपल्याला जशी मदत मिळाली तशी मदत आपण दुसऱ्याला सुद्धा करण्याची वृत्ती ठेवा. काही वर्षांनी किंवा महिन्यांनी, दिवसांनी तुम्हाला पण पत्र येईल की तुम्ही ती आठवण आयुष्यभर जपून ठेवाल.

***संकलन : दिलीप वा. भिडे, पुणे***

---

# नातीगोती

**– सौ. वर्षा दिलीप भिडे,**
बावधन, पुणे २१

नाती विसविशीत होऊ लागली आहेत ह्यामागे मतांतरे असली तरीसुद्धा ती अधिक दृढ करणे ही काळाची गरज आहे. नाते जोडण्याची कला अवगत करण्यासाठी कोणतीही कार्यशाळा किंवा प्रशिक्षणाची आवश्यकता नाही. त्या करिता एकमेकांचे आचार-विचारांचे सूर जुळले तर आपोआपच एकमेकांबद्दल आपुलकी वाटून ती नाती आपलीशी वाटू लागतात. नाती जपण्यासाठी विश्वासार्हता, त्याग, सहिष्णुता व पारदर्शक व्यवहार ह्या गोष्टी आवश्यक आहेत. कारण एकमेकांच्या विश्वासाने त्यागाची भावना ठेवून परिस्थितीशी मिळते-जुळते घेण्याची तयारी असेल तर कलह होत नाहीत. तसेच ह्या नात्यामध्ये शक्यतो व्यवहार नसावा परंतु समजा व्यवहार केलाच तर विश्वासाला तडा जाणार नाही इतका तो पारदर्शक असायला हवा. एकमेकांचे आचरविचार पटत नसले तरीसुद्धा समजुतदारपणाची झालर असली पाहिजे. ह्या वरील गोष्टींचा ठेवा जवळ असेल तर आपोआपच एकमेकांबद्दल आपुलकी वाटून ती नाती रक्ताच्या नात्यापेक्षा अधिक घट्ट होतात. खरंतर आजच्या धकाधकीच्या जीवनात विभक्त कुटुंब पद्धती, पैसा ह्यामुळे रक्ताची नाती तकलादू होत आहेत हे चित्र दिसत असले तरी सुद्धा वडिलधाऱ्यांचा आदर, एकमेकांच्या सुखदुःखाला, अडीअडचणीला धावून जाणे हे सर्व घरांमधील संस्कारांच्या जडणघडणीवरच अवलंबून आहे. पैसा हे माध्यम नाते जोडण्यासाठी किंवा तोडण्यासाठी असले तरीसुद्धा माणसाला आयुष्यात एका ठरावीक वेळेला मात्र आपुलकी, माणुसकी ह्याची जाणीव होते व त्या ठिकाणी पैसा हे माध्यम दुय्यम ठरते.

# मातृदिन एक विचार...

- श्रीमती उज्वला बा. साठे, पुणे
मो. ९८५०८४५६७०

मातृदिन म्हणजे आईसाठी दिलेला दिवस आणि थोड्याफार प्रमाणात का होईना अंशतः तरी ऋण फेडण्याचा केलेला विचार. मातृदिन हा दिवस जागतिक समजला जातो. परदेशांतून आलेली ही संकल्पना आहे. आपण लोक पाश्चात्यांचे अनुकरण करण्यात पुढे आहोत. त्यांचे जे चांगले आहे ते जरूर घ्या. प्रत्येक देशाप्रमाणे जसे हवामान बदलते त्याप्रमाणे माणसाला वागावे लागते. तसेच प्रत्येक देशाची संस्कृती जशी असेल त्याप्रमाणे वागायला नको का ? आपली भारतीय संस्कृती जगात आदर्श मानली जात आहे. असे असताना वेगळा मातृदिन करण्याची काहीच गरज नाही. पाश्चात्यांना आपल्या संस्कृतीचे अप्रूप वाटते. आपल्या संस्कृतीकडे लक्ष वेधून विचार करत आहेत. असे असताना आपल्याला आईसाठी वेगळा एक दिवस द्यावाच लागत नाही. जन्मल्यापासून आपली आई ही आपल्यानिकटच असते. बाळाचे लहानपण अनुभवण्यासाठी, त्याचा आनंद मिळविण्यासाठी ती सतत प्रयत्न करत असते. नव्हे तर त्यासाठी बिनपगारी, अर्धवेळ अशी नोकरीची तरतूद ती करत असते. हे आपल्याकडे पिढ्यानपिढ्या आलेले वात्सल्य प्रेम पाहायला मिळते. परदेशात जन्मापासूनच आई व मूल वेगळे असते. अर्थात त्यांना वात्सल्य नसते असे नाही. पण अंगावरच्या दुधामुळे, सहवासाने जे एक वात्सल्य वाढत जाते तसे परदेशात होत नाही. कर्तव्यापोटी जेवढे हवे तेवढेच त्या करतात. आपोआपच आई व मूल यांत दरी निर्माण होते. यातून अंकूर फुटून प्रेमाची वाढ कशी होणार ? सोळा वर्षांपासून ती मुले आईवडिलांपासून बाजूला होतात. स्वतंत्र होतात. आपल्या पायावरही उभी राहतात. अशा परिस्थितीत त्यांना आईबद्दल वाटणारे प्रेम व्यक्त करण्यासाठी एक दिवस ठरलेला असतो. म्हणून मदर्स डे पाळण्यात येतो. आपण वर्षानुवर्षे नव्हे तर मुलामुलींची लग्नं होईपर्यंत ती आईवडिलांच्या मायेच्या छत्राखाली असल्याने त्यांचे प्रेम एकमेकांना सतत मिळत राहते. आपल्याकडे अजूनसुद्धा अशी प्रथा आहे की मुलं बाहेर जाताना आईला नमस्कार करून जातात. हे कशाचे प्रतीक समजायचे ? तेव्हा आपल्याकडे वेगळा मातृदिन करण्याची गरज भासत नाही. कारणपरत्वे ज्यांचे आईवडील खूप लांब आहेत, परदेशात आहेत, वृद्धाश्रमात आहेत त्यांच्यासाठी मातृदिनानिमित्त एक दिवस त्यांच्याकडे जाऊन आईबद्दलची कृतज्ञता व्यक्त करणे योग्य आहे.

आपल्या संस्कारांप्रमाणे आपल्या घरातच दोन-तीन पिढ्यांची माणसे एकत्र सुद्धा नांदू शकतात. तेथे रोजच ३६५ दिवस तेवता नंदादीप असताना रोजच मातृदिन साजरा होतो. तो वेगळा साजरा करण्याची गरजच भासत नाही. विभक्त कुटुंब जरी असले तरी एकमेकाला वरचेवर भेटण्याची वेळ असतेच. आईवडिलांच्या सान्निध्यात असताना आपोआपच आपले मातृपितृऋण कमी करण्याचे प्रयत्न करत असतो. त्यासाठी वेगळा दिवस ठरवण्याची वेळच येत नाही. असे म्हणतात की मातृऋण कधीच फिटत नाही. आपण त्यांना गरजेनुसार योग्य वेळी आपल्याकडून होईल तेवढी मदत करण्यातच खरे प्रेम जागृत होत असते. आपल्याकडून होईल तितकी आर्थिक, शारीरिक, मानसिक मदत करून त्यांना सुखी ठेवणे म्हणजे रोजच मातृदिन साजरा होईल.  आजकालचे आईवडील बहुतांशी आर्थिकदृष्ट्या फारसे अवलंबून नसल्याचे दिसून येते. राहिले काय तर शारीरिक कष्टाची व मानसिक भूक भागविण्याची गरज असते. ती गरज आपल्याकडून होईल तेवढी भागवणे म्हणजेच मातृदिन साजरा करणे नव्हे का ?

---

# कृष्ण

- श्रावणी अनिरुद्ध भिडे,
पनवेल

राधेचा कान्हा, पार्थाचा माधव तर द्रौपदीचा गोविंद... नावं अनेक... वेगवेळ्या अर्थाची... कृष्णाने आयुष्यातलं प्रत्येक नातं कसं हळुवार जपलं. प्रत्येक नात्याप्रती आपलं कर्तव्य पूर्ण केलं. त्याच्या आयुष्यात आलेल्या प्रत्येकाला त्याने धर्माचा मार्ग दाखवला. पूर्ण पुरुष यालाच म्हणतात बहुतेक... महाभारताच्या युद्धाच्या वेळी अर्जुनाचं अवसान गळालं. कर्तव्याच्या भावनेची जागा परिजनांच्या मोहाने घेतली. कृष्णाने त्याला समजावलं आणि जगाला प्रेरणा देणाऱ्या, जगणं शिकवणाऱ्या भगवद्गीतेचा जन्म झाला. हे शरीर नश्वर आहे. माणूस म्हणजे बाह्यरूप किंवा शरीर नाही. आत्मा, अंतरंग म्हणजे माणूस. हा आत्मा या शरीररूपी माध्यमाचा वापर करून कर्म करतो. जो स्वतःला शरीराच्या रूपात पाहतो, स्वार्थी विचार करतो, या नश्वर शरीराच्या सुखासाठी दुसऱ्याचे मन दुखावतो त्याला तर अधर्मी म्हणतात. जो स्वतःला आत्म्याच्या रूपात पाहतो, दुसऱ्याच्या शरीरापेक्षा, दिसण्यापेक्षा त्याच्या आत्म्यावर, त्याच्या असण्यावर प्रेम करतो, स्वार्थापेक्षा परमार्थाचा विचार करतो तो आपोआपच धर्माच्या मार्गाला लागतो. जो मोह सोडून परमार्थासाठी कर्म करतो त्याच्या आयुष्यातला प्रत्येक दिवस, प्रत्येक क्षण सुंदर होतो. हेच तर आहे भगवद्गीतेचे सार ! हा संदेश दिला कृष्णाने साऱ्या जगाला ! कृष्णाने अर्जुनाला अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेलं. कृष्ण अर्जुनाच्या आयुष्यातला दिशादर्शक, मार्गदर्शक बनला. आपल्याला योग्य दिशा दाखवणारा, मार्ग दाखवणारा, आपल्याला चांगल्या वाईट गोष्टींची ओळख करून देणारा, आपल्याला प्रेरणा देणारा, प्रोत्साहन देणारा कृष्ण आपल्या सगळ्यांच्या आयुष्यात असतो. गरज आहे त्याला ओळखण्याची, त्याने दाखवलेल्या मार्गावर चालण्याची. एकदा का आपल्याला आपल्या आयुष्यातला कृष्ण गवसला की आपला अर्जुन व्हायला वेळ लागणार नाही. इतक्यावरच न थांबता आपल्या ओळखीचा आपला मित्र, नातेवाईक वाईट मार्गावर चालला असेल, भरकटत असेल तर त्याला योग्य मार्ग दाखवूया. मी का म्हणून त्याला समजावू ? त्यात माझा काय फायदा ? असा स्वार्थी विचार न करता परमार्थाचा विचार करूया. अडल्यानडल्यांची मदत करूया. आनंद वाटूया. कुणाचं तरी आयुष्य सुंदर करूया, आपणही कुणाच्यातरी आयुष्यातला कृष्ण होऊया ...!

# फटाके : एक आठवण

- सौ. योगिनी मा. भिडे, पुणे
मो. ७५८८२३५८८०

सन २०२१ च्या दिवाळीचा पहिला दिवस. दिवाळीची सगळी तयारी छान केली होती. घरी चविष्ट फराळाचे पदार्थ केले होते. आम्ही सगळे नरकचतुर्दशी म्हणून पहाटे उत्साहाने उठलो. मिस्टरांनी चहा करायला घेतला पण चहा करताना त्यांना उजव्या डोळ्याने एकदमच कमी दिसायला लागले. ते घाबरले. मलाही काळजी वाटू लागली. माझ्या मिस्टरांचे जुलै २०२० मध्ये उजव्या डोळ्याचा 'रेटिना डिसलोकेट' झाला म्हणून ऑपरेशन झाले होते. उजव्या डोळ्याची व्यवस्थित काळजी घेणे, डोळ्यात औषधांचे ड्रॉप्स घालणे, वेळच्या वेळी डॉक्टरांकडे फॉलोअपसाठी जाणे चालू होते आणि अचानकच त्यांना त्या डोळ्याने कमी दिसायला लागले होते. त्या दिवशी दिवाळी म्हणून दवाखान्याला सुट्टी होती. आम्ही डॉक्टरांना फोन केला. त्यांनी फोनवर औषध सांगितले. आम्ही लगेचच ते औषध विकत आणून त्याचे ड्रॉप्स डोळ्यात घालणे सुरू केले. आमचा तो दिवस, संध्याकाळचे लक्ष्मीपूजन काळजीतच पार पडले. दुसऱ्या दिवशी मिस्टर आणि मुलगा दवाखान्यात गेले. रेटिना एकदमच व्यवस्थित होता. आता नेहमीप्रमाणे दिसायलाही लागले होते. डॉक्टर म्हणाले, ''काही वेळा डोळ्याचे प्रेशर कमी जास्त झाल्याने असे होऊ शकते.'' मिस्टर आणि मुलगा आनंदाने घरी आले.

मुलगा म्हणाला, ''आई, बाबांचा डोळा पूर्ण बरा आहे. आपली फार मोठी काळजी दूर झाली. मी फटाके आणू का ?'' मीही त्याला थोडेसे आण म्हटले. मुले मोठी झाल्यापासून हल्ली आम्हीही फटाके आणत नव्हतोच. संध्याकाळी आम्ही सगळे फटाके उडवायला गच्चीत गेलो. आनंदाने फटाके उडवणे चालू होते आणि माझे मन भूतकाळात गेले. आम्ही लहान असताना सारसबागेजवळच्या सणस ग्राऊंडवर फटाक्यांचे स्टॉल्स असायचे. दिवाळीच्या आधी शाळेत जाताना ते स्टॉल्स बघितले तरी खूप आनंद व्हायचा. दिवाळीच्या अगदी आधी मी, माझा लहान भाऊ, आई आणि बाबा स्टॉलवरून फटाके आणायला जायचो. फटाके आणले की मी आणि माझा भाऊ फटाके वाटून घ्यायचो. ते सादळू नयेत म्हणून पोत्यात गुंडाळून ठेवायचो. रोज थोडे थोडे उडवायचो. अगदी देवदिवाळीपर्यंत ते फटाके पुरवायचो. त्यावेळी फटाक्यांचा धूर, त्यामुळे होणारे वायूप्रदूषण या गोष्टी कानावरही नव्हत्या.यावेळी मात्र मला फटाक्यातून बाहेर पडणारा धूर दिसू लागला. सध्या बऱ्याच वाढलेल्या प्रदूषणाचे विचार मनात यायला लागले. अर्थात मी बोलले काहीच नाही. त्यानंतर दोनच दिवसांनी माझी सव्वा वर्षांची नात, मुलगी आणि जावई आमच्या घरी आले. आम्ही परत फटाके उडवायला गच्चीत गेलो. मुलगा भुईनळे, भुईचक्र उडवू लागला. सुरुवातीला नात थोडी घाबरली. पण मग तिनेही फटाक्यांचा आनंद घेतला. यावेळी मात्र माझ्या मनात ना माझे बालपण होते ना प्रदूषण. नातीच्या आश्चर्यचकित चेहऱ्याकडे बघताना मीच माझे भान विसरले होते. एक नवीन गोष्ट बघितल्याचा आनंद आणि आश्चर्य तिच्या चेहऱ्यावरून ओसंडून वहात होते.

## व्यवहारातील सहजपणे बोलण्यात येणारी अवतरणे, त्यांचे मूळ व अर्थ

- सौ. नीला कुमार भिडे, पुणे

✻ **अवतरण १ -** वक्ता दशसहस्त्रेषु। दाता अवति वा न वा

✻ **मूळ श्लोक -** शतेषु जायते शूरां। सहस्त्रेषुच पंडितः।
वक्ता दशसहस्त्रेषु। दाता भवति वा न वा॥

✻ **अर्थ -** शंभरात एखादाच माणूस शूर निघतो. हजारात एखादाच माणूस पंडित, विद्वान, हुशार, चाणाक्ष निघतो. दहा हजारात एखादाच माणूस उत्तम वक्ता असू शकतो. पण परतफेडीच्या अपेक्षेविना दान देणारा दाता हा क्वचितच सापडतो.

✻ **अवतरण २ -** जननि जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी

✻ **मूळ श्लोक -** अपि स्वर्णमयी लंका। न मे रोचति लक्ष्मण।
जननी जन्मभूमिश्च। स्वर्गादपि गरीयसी॥

✻ **अर्थ -** रावणवधानंतर बिभिषणाने श्रीरामांना लंकेचा राजा म्हणून राज्याभिषेक करण्याची इच्छा व्यक्त केली. लक्ष्मणाचाही त्याबाबतीत आग्रह होता, त्यावेळी श्रीरामांनी लक्ष्मणाला दिलेले हे उत्तर आहे की, 'लंका कितीही श्रीमंत जरी असली तरी (सोन्याची) (स्वर्णमयी) तरी मला माझी आई आणि जन्मभूमी वजा करून कुणी स्वर्गही दिला तरी तो मला नको आहे. तो मला रुचणार नाही. मला माझी आई आणि जन्मभूमी स्वर्गापेक्षाही प्रिय आहेत.

## नववर्ष

बावीस गेले भूतकाली, तेवीस आले सोनपावली।
एक अंकाचा फरक केवळ, जाई निसटून तसाच काळ।

कुणी न शके त्यास टाळू, मुठीतून जणु सरके वाळू।
तीच माणसे तीच नाती, नव्याने येतील का हाती ?

वर्ष सरता होती वृद्ध, की म्हणावे होती समृद्ध ?
जे जे चुकले, ते अनुभवले, जे जे सुटले, नव्हते अपुले।

जे गवसले, प्रयत्नांती मोठे, जे जे हुकले, प्रयत्न थिटे।
पाहू सारे डाव नव्याने मांडून, मरगळ सारी झटकून टाकून।
स्वागत करू या नववर्षाचे, मिळे सर्वा निमित्त हर्षाचे।

- चिंतामणी भिडे,
ठाणे

# केळवडे येथील देवस्थान

- स्व. सुमती वामन भिडे,
पुणे

श्रीव्याडेश्वर मंदिर (देवी अंबेजोगाई असावी) देवी त्रिभुवन सुंदरी आणि श्रीगणेश मंदिर हे ३०० वर्षांपूर्वीचे बांधलेले पुरातन मंदिर आहे. त्या मंदिराचा जीर्णोद्धार सुमती भिडे यांनी त्यांचे पती कै. वामन विश्वनाथ भिडे ह्यांच्या इच्छेनुसार केला. सध्या भिडे कुलवासियांची ११ वी पिढी (औरस) नांदत आहे. त्या संबंधी प्रथम उत्सवाची माहिती लिहिते आणि त्यानंतरचा भिडे कुलाचा थोडक्यात इतिहास लिहिते. १३ मार्च २०२२ रोजी आमच्या ३०० वर्षांपूर्वीच्या मंदिरांचा जीर्णोद्धार झाला. मूळ मंदिराचा गाभारा छोटा १० X १० चा असून बाहेरचा सभामंडप खूप विस्तीर्ण आहे. बहुतेक सर्व मंदिरांची रचना अशीच असते. बरोबर ११ वाजता सर्व भिडे कुलवासी गावातच एका रिसोर्टमध्ये जमली. तिथे राहण्याची, जेवणाची सर्व व्यवस्था केली होती. सर्वांनी सकाळचा थोडासा नाश्ता आणि चहा घेऊन देवळात जायचे ठरले होते. आता सर्व भिड्यांकडे स्वतःच्या गाड्या असून थोडेसे मार्ग पुढे येतील तसतसे आपापल्या गाड्या घेऊन इथे पोचायचे, न्याहारी आणि चहा, कॉफी घेऊन साडे अकरापर्यंत परत आपापल्या गाड्या घेऊन देवळात जायचे.

आताचे केळवडे गाव हे पूर्वीचे खेडेगाव राहिले नसून सरकारच्या ग्रामसुधार योजनेचा लाभ ह्या खेड्यास झाला. सर्व गावामध्ये डांबरी सडक झाली असून गावात जागोजागी विहिरी खोदल्या असून नळाद्वारे पाणी घराघरांत पोचले आहे. देवळापलीकडेही शाळेची इमारत आहे. येथून नदीवर छोटा पूल बांधला असून साळवडे गावात आणि यमाई मंदिरात जाता येते. हे मंदिर दुसऱ्या छोट्या टेकडीवर आहे. तालीम-मल्लांसाठी पाटील, कुलकर्णी आदी बारा बलुतेदार छत्रपतींच्या वेळेपासूनचे आहेत. पूर्वी ते विनावेतन काम करायचे. शिवगंगा नदी शिवापूर गावाला वळसा घालून केळवडे गावात शिरते. गावाचे निसर्गसौंदर्य फारच रमणीय आहे. सडकेपासून दोन मैल आत केळवडे खेडे वसलेले आहे. समोर सडकेपलीकडे छोटीशी टेकडी आहे.

**केळवडे गावाची साधारण रचना -** गावाच्या शिवेवर काळुबाईचे मंदिर आणि म्हसोबाचा दगड आहे. येथून आत गावकुस सुरू होते. प्रत्येक खेड्यात असेच पूर्वी पुरातन कालापासून चालत आलेले काळुबाईचे मंदिर आणि म्हसोबाचे दगड आहेत. ही दैवते खेड्यातील लोकांचे रक्षण करतात असा समज आहे. तेथून आत जाण्यास पक्की सडक बांधली आहे. आजही एस.टी.ची सोय झाली असली तरी गावामध्ये एस.टी. जात नाही. एस.टी.तून येणाऱ्यांना सडकेवरच उतरावे लागते. दोन्ही बाजूस हिरवीगार शेते थेट गावापर्यंत. नदी गावाला वळसा घालून गावाच्या मागून थेट भिडे कुल गणपती मंदिरापर्यंत येते. इथे त्या छोट्या टेकडीला वळसा घालून देवळाच्या मागून बनेश्वरच्या मार्गाने पुढे जाते. इथे पायऱ्यांचा पक्का दगडी चढी वार १०० पायऱ्यांची असेल. वाड्यात पाणी हंडे, घागरी भरून डोक्यावरून न्यावे लागे. आता वाड्याची वरची वाट बंद झाली आहे. पण श्रीगणपती मंदिरापर्यंत खालच्या रस्त्याने येता येते. ह्या सर्वांचा जीर्णोद्धार करणे, देवळापुढील प्रशस्त आवार मागील भाग स्वच्छ करणे, दारे, भिंती, पूर्वीच्या जुन्या झालेल्या, मोडकळीला आलेल्या. हंड्या, झुंबरे फुटलेली. हे सर्व स्वच्छ करून गावात वीज आलेलीच होती, देवळातही विजेचा दिवा लावता आला होता. गावात एकच कुलकर्णी यांचे ब्राह्मण कुटुंब होते. त्यातील कुलकर्ण्यांनी जेमतेम त्या काचावगैरे उचलून थोडेसे स्वच्छ करून नित्य पूजेसाठी तिथे जात असत.

मंदिराचा जीर्णोद्धार करण्यास अडीच महिने लागले. केळवडे येथे गवंडी वगैरे मिळत असले तरी कुशल इंजनिअर पुण्याहूनच न्यायला लागणार होते. पुण्यात अनेक कामे करण्यात ते व्यग्र असून कोणीही लोक ३० मैलावरील खेडेगावात जाण्यास तयार नव्हते. त्यामुळे माझ्या पतींच्या हयातीत त्यांची इच्छा पूर्ण झाली नाही. मी ती इच्छा पूर्ण करण्याचे ठरविले आणि सुदैवाने आमच्या जवळच्या नात्यातील श्री. अमित केळकर आमच्या केळवडे गावच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यास तयार झाले. रोज स्वतःच्या गाडीतून ते जात असत आणि बरोबर जाणते, कुशल कारागीर बरोबर नेत असत. अशा तऱ्हेने २॥ महिन्यांत सर्व मंदिराचे बांधकाम झाले. सर्व दारे बदलली, फरशी सभा मंडपातील आणि बाहेरच्या विस्तृत आवाराची स्वच्छता केली. त्यानंतर देवळाची आतून-बाहेरून रंगरंगोटी झाल्यावर उत्सवाची तारीख ठरवली. ह्या सर्व जीर्णोद्धाराचा खर्च साधारण २ लाख रुपये, हा खर्च सुमती भिडे यांनी केला.

१३ मार्च, २०२२ रविवारी सर्व भिडे मंडळी आपापल्या गाड्यांमधून थोडेसे मागे-पुढे जसे जमतील तसे केळवडे गावाच्या आतच सडकेपासून जवळच रिसोर्टमध्ये सर्वांच्या चहा-नाश्ता, जेवण, दुपारी वाटल्यास वृद्ध व्यक्तींना विश्रांतीसाठी कॉटसूची व्यवस्था हे सर्व माझा मुलगा संजय व स्नुषा सौ. सुषमा ह्यांनी आठ दिवस आधी जाऊन येणाऱ्या मंडळींना सर्व सुविधांची व्यवस्था केली. देवळाच्या सभामंडपात सर्वांना बसण्यासाठी खुर्च्या ही सर्व व्यवस्था चोख झाल्यावर सर्वांना आमंत्रण केले. आणि साधारण ११ चे सुमारास सर्व भिडे कुलवासी रिसोर्टमध्ये जमले. त्याआधी पहाटे ५ वाजताच माझा मुलगा संजय, सून सुषमा, नात सायली, नात जावई विक्रम आणि पणती अनिका सर्व पूजा साहित्य, ५० उकडीचे मोदक, दाराला लावण्यास तोरण, दारात सुबक रांगोळी, दारावर पाटी, भिडे कुलवासी यांचे श्रीगणेश मंदिर, त्यावर हार, ही सर्व आधीची तयारी वरील सर्वांनी केली. सनईचे सूर दारात वाजत होते. सर्वांचे चहापाणी, नाश्ता झाल्यावर ११॥ चे सुमारास सर्व मंडळी देवळात जमली. मूळचे केळवडे गावातील कुलकर्णी ह्यांनी वेदपाठशाळेत २ वर्षे शिक्षण घेऊन सध्या पुण्यातील प्रसिद्ध दगडूशेट हलवाई गणपती आणि दत्त मंदिराची नित्य

पूजाअर्चा करणारे केळवडे येथे आले होते. सध्या पूजाअर्चा करणाऱ्या कुलकर्णी यांचे बंधू त्यांनी शास्त्रोक्त पूजा सांगितली. माझा मोठा मुलगा सुधीर याने पूजा सुरू केली. बाहेर संजय सर्वांना मंदिर केव्हा बांधले, जीर्णोद्धार कितीदा झाला असा पूर्व इतिहास सांगत होता. पूजा संपन्न झाल्यावर श्रीगणपती, श्रीमाता त्रिभुवनसुंदरी ह्यांना वस्त्रालंकारांनी सजविण्यात आले. माझी मुलगी लता देवधर हिने मातेस रेशमी साडी शिवून आणली होती. माझी सून सुषमाने मातेस एकदाणी, हातात बांगड्या, मंगळसूत्र वगैरे आणले होते. ते सर्व वस्त्र व आभूषणे घालून झाल्यावर श्रीगणेश, देवीमाता व श्रीशंकर सर्व देवांना हार, फुले वाहिली आणि सर्व जेवणाचे ताट आणि उकडीच्या मोदकांचा नैवेद्य दाखवला. नंतर घंटा, टाळ यांच्या गजरात आरतीला सुरुवात झाली. सर्वांना आरत्या येत होत्याच. माझा पुतण्या विनय भिडे यांनी फोटोग्राफर बोलावून देवळातील पूजा करतानाचे आणि आरत्या, अथर्वशीर्ष सर्वांनी म्हटले त्याचे व्हिडिओ शुटिंग केले आणि फोटोही काढले. सर्व पूजाअर्चा झाल्यावर सर्व भिडे कुलवासियांनी गाभाऱ्यात जाऊन दर्शन घेतले. प्रत्येकाने हार, नैवेद्याला पेढे, नारळ वगैरे आणलेच होते. अशा तऱ्हेने मोठ्या उत्सवाचा समारंभ झाला. पूजा, दर्शन, आरत्या ह्यामुळे सर्व वातावरण प्रसन्न वाटत होते. सहभोजन थाटात झाले. संजय-सुषमा आणि नात सायली, नातजावई विक्रांत ह्यांनी सर्वांना जेवण व्यवस्थित वाढप होते आहे ना ते बघितले. जेवण चांगले होते पण वाढपी कमी होते. त्यामुळे वरील सर्वांनी वाढण्यासही मदत केली. नंतर जेवणे उरकून सर्वजण संजय-सुषमाचे आदरपूर्वक वागणे आणि देवळांची शोभा वाढविणारे रांगोळी, मुख्य दरवाजाला तोरण वगैरचे कौतुक केले. आजचा सर्व खर्च चि. संजयने केला. भिडे कुलातील केळवडे जीर्णोद्धारास काही जणांना येणे जमले नाही. त्यांचेसाठी पेढ्यांची पाकीटे प्रसाद म्हणून देण्यात आली. जेवणात नैवेद्य म्हणून सर्वांसाठी उकडीचे मोदक प्रसाद म्हणून नेले होतेच. सर्वांना प्रत्येकी एक उकडीचा मोदक वाढण्यात आला होता. आता परतीच्या प्रवासास आपापल्या गाड्या काढून निघाले. अशा तऱ्हेने जीर्णोद्धार संपन्न झाला.

**पूर्वेतिहास -** केळवडे भिडे कुल कोठून आले ? परशुरामाने सर्व कोकणपट्टा पूर्वी जंगल, दाट झाडी, पार सह्याद्रीच्या पश्चिम घाटातून दऱ्याखोऱ्यातून जाता येण्याइतपत वाट तयार केली. श्रीराम आणि परशुराम ह्यांची भेट झाल्याचा उल्लेख रामायणात आहे. हे सर्वांना माहीतच आहे. आता ३०० वर्षांपूर्वी मूळ भिडे कुल (केळवडे येथील टेकडीवर कोठून आलेह असावेत ह्याचा मागोवा घेते. सर्व ब्राह्मण कुले कोकणभर आहेत. ते कोकणात राहतात म्हणून कोकणस्थ ब्राह्मण. तेव्हा परशुरामाने समुद्र किनारी बाण मारला. तो बाण जिथपर्यंत गेला ती भूमी परशुरामाची. पार गोमंतक (हल्लीचे गोवा) पर्यंत बाण गेला म्हणून गौमंतक. गौ चा अर्थ बाण. इथेही परशुरामांनी १० ब्राह्मण कुले वसविली. त्याची माहिती दुसऱ्या लेखामध्ये लिहीन. सर्व कोकणस्थ ब्राह्मण कुलांचे दैवत परशुराम हेच बनले. त्यावेळचे कोकण आतासारखे संपन्न नव्हते. आंबेमोहोर तांदूळ डोंगर उतारावरील. हापूस आंबे, काजूची झाडे, आमसुले थेट तळकोकणापर्यंत पसरलेल्या डोंगरांवर हे वृक्ष आहेत. सागरकिनारी नारळाची बने आहेत. मोठमोठ्या वाड्या-नारळ वने आणि डोंगरच्या डोंगर आजही कोकणस्थांच्या मालकीचे आहेत. म्हणजेच सर्व कोकणातील कोकणस्थांनी स्थलांतर केले असे नाही. सागरकिनारीच गोड पाण्याच्या विहिरी आहेत. खाऱ्या समुद्राच्या काठी वाढणारी नारळाची बने मात्र त्यावर येणारे नारळ मात्र मधुर, गोड पाण्याची शहाळी आणि त्यातूनच लगडलेले नारळ आणि एकेका झाडाला भरपूर नारळ लागतात. नारळाच्या उंच झाडांना वर्षभर गोड पाणी लागते हे विहिरीतून मोटेद्वारे पाणी नारळ बनांमध्ये खेळवले जाते. वाहतुकीच्या सोयी उपलब्ध नसल्याने तरी पण मोठाली भात शेती. अशी मालकीची स्वतःची नारळ बने आणि डोंगराच्या डगरांवर आंबा, काजू, आमसुले ह्यांचे उत्पन्न आहे. तरी सर्व ब्राह्मण कुटुंबे सर्व कोकणभर आजही आहेत.

राजापूर जवळील डोंगरावर जिथे थोडी सपाट जमीन आहे त्यावरही काही कोकणस्थांनी घरे बांधली असावीत. नंतर ४ पायऱ्या उतरून खाली आले की तिथे परत सपाट जमीन लागते, तिथेही ब्राह्मण वस्ती आहे. त्याला खालची आळी असे म्हणतात. ४ महिने भरपूर पाऊस, नंतर रांजण, माठ वगैरे भरून ठेवलेले. अशा ठिकाणी ब्राह्मण कुले राहात. तेथील वस्ती उठली असावी. भिड्यांचे मूळ पुरुष येथूनच आले असावेत. शेजारी खरे राहात. ते म्हणाले, 'आम्हीही तुमच्या बरोबर येतो.' त्यावेळी प्रवासाची काहीच साधने नव्हती. छकडे म्हणजे छोटी एका बैलाची बैलगाडी. ह्या गाडीचा उपयोग नवरी सासरी जाताना करीत असत. बहुतेक आपल्याच गावात मुलीला सासर बघत. छकडे म्हणजे बैलगाडीला वरून गोल घुमटाप्रमाणे छत असलेली १ बैलाची गाडी. भिडे व खरे कुटुंबीय पायीच मजलदरमजल करीत निघाले. बायका, लहानमुले आणि थोडी भांडीकुंडी आणि झोपण्यासाठी अंथरुण-पांघरुणे, अंगावर घालायची बायकांची लुगडी. मुले आणि पुरुषांसाठी धोतर आणि उपरणी. त्यावेळी शिवणाचे मशिन उपलब्ध नव्हते. म्हणून बायका हातानेच शिवणकाम करीत. बाळाचे कपडे, स्त्रियांसाठी चोळ्या, मुलींना परकर पोलकी वगैरे. ते सर्व कपडे पत्र्याच्या पेटीत ठेवून, अंथरुण पांघरुणाच्या वळकट्या करून दोरी बांधत. एका छकड्यात सर्व भिडे-खरे कुटुंबियांचे सामान आणि एका छकड्यात बायका-मुले असे दोन छकडे घेऊन. पुरुषमंडळी चालत निघाली. छकडे अर्थातच लवकर मुक्कामाला पुढील गावी पोचत. सर्व खेड्यामधली घरे ब्राह्मणांचीच. कुणाच्याही घरी मुक्काम करावा. तिथे 'अतिथी देवो भव' ह्या म्हणीप्रमाणे आपल्या दारात आलेल्याचे स्वागत करण्याची प्रथा होती. सर्व भारत देशात माणसे काशी किंवा रामेश्वर यात्रा करीत, तेही अशा ब्राह्मण घरांमधून किंवा धर्मशाळेत वास्तव्य करीत. ज्यांची जागा मोठी असली तरी दोन कुटुंबे राहण्याइतपत जागा नसेल त्यावेळी पुरुष माणसे जेवणखाण ब्राह्मणांचे घरी करून जवळच्या देवळात झोपायला जात. स्त्रिया व मुलांची सोय घरी होई. सर्व प्रवास डोंगरघाटातून असाच माणसे करीत. परशुराम घाट संपेपर्यंत डोंगरकाठी पाणथळ भागामध्ये भातशेती करीत. तिथेही कोळी जमात शेतीला मदत करीत. त्यांची झापाची घरे असायची. झाप म्हणजे नाराळाच्या वाळलेल्या फांद्या आणि कोकणभर कुठे आत समुद्र आलेल्या खाड्या तिथे नारळांची बने असत. एकत्र कुटुंबाची पद्धत होती. सखखी, चुलत एकत्रच राहात. परशुराम

आम्ही भिडे अंकास हार्दिक शुभेच्छा !!

# Bhide & Associates

Retainership of GST - Registration, Returns, Audit, Consultany & Other Allied Services

Office : Plot No. 100, Opp. MSEB Sub Station,
Add. : MIDC, Satara, Phone : 02162-240599
Email : psbexconsult@gmail.com
Reg.off : F.No.6, Devika Appt., 15/1, Vyankatpura Peth,
Satara - 415 002. Ph. : 02162-284358

**Shriram A. Kulkarni**
Cell : 9881237931, 7038790066

**Prashant S. Bhide**
Cell : 9423035027, 7776027779

घाट संपतो तिथे घाटमाथ्यावर परशुरामक्षेत्र लागते. मी इथे गेलेली आहे. साधारण २५० पायऱ्या उतरून खाली आले की थोड्या सपाट जागेवर रामाचे मंदिर उभारले आहे. मंदिर लहान असून तिथे श्रीराम, सीता आणि लक्ष्मणांच्या मूर्ती आहेत. ह्याचे समोर परशुरामांचे भव्य तैलचित्र आहे. येथून तळकोकणापर्यंतचा वळणावळणाचा घाट फारच रमणीय दिसतो. ह्या ठिकाणी देवळामागे रेणुकामातेचे छोटे मंदिर आहे. इथे परशुरामघाट संपतो. भिडे-खरे कुटुंबियांसह असे मजलदरमजल करीत गुहागर मार्गे साधारण ३-४ महिन्यांनी असेल, कोल्हापूरला पोचले. हे त्यावेळचे मोठे शहर असून छत्रपती शिवाजीराजांचा दुसरा पुत्र राजाराम महाराज व ताराराणी राहात असत. इथे मोठ्या धर्मशाळा असून तिथे राहण्याची छान सोय होती. पूर्व-पश्चिम म्हणजेच कोकण आणि देशावरील सह्याद्रीच्या दोन्ही भागांस जोडणारे जंक्शनच म्हणता येईल. दुसरे दिवशी भिडे-खरे कुटुंबीय ताराराणींना भेटले. ताराराणींनी त्यांचे आदरपूर्वक आतिथ्य केले. भिडे-खरे कुटुंबीयांनी आपणास देशावर वास्तव्य करायचे आहे असे सांगितले. 'तुम्हास कशा प्रकारचे ठिकाण राहायला आवडेल ?' असे ताराराणींनी विचारले. आम्हांस डोंगरकाठी टेकडीवर असेल असे गाव असावे, जेणेकरून आम्हास कोकणातच राहिल्यासारखे वाटेल. ताराराणींनी दोघांसाठी केळवडे येथील ही टेकडी दिली. दोघांना इनामे दिली आणि केळवडे येथे उत्पन्नासाठी शेतजमिनी दिल्या. मळे पण दिले. दोघांना प्रत्येकी २ बैलांच्या गाड्या दिल्या. जेणेकरून दोघांना शेती करता लागणारे बैलांची जोडी मिळेल आणि केळवडे गावामध्ये कुठेही घर बांधून राहण्याची मुभा दिली. अशा तऱ्हेने भिडे-खरे कुटुंबीय केळवडे इथे स्थायिक झाले. **(क्रमशः)**

**पत्ता चुकीचा असल्यास अंक खालील पत्त्यावर परत पाठवावेत...**
**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, द्वारा : ले. क. सुनिल वासुदेव भिडे,**
**१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,**
**पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०**

**सायंदैनिक प्राजक्त**

'प्राजक्त' हे पत्र मुद्रक सौ. विनीता प्रफुल्ल डबीर यांनी प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांचेसाठी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६०१२ येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. संपादक : प्रफुल्ल डबीर फोन २५४०४२७

RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI
Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS